

# १२ संसदीय प्रणाली

भारतीय राज्यघटनेमध्ये केंद्र व राज्ये या दोहोंमध्येही संसदीय प्रणालीच्या सरकारची तरतूद आहे. कलम ७४ व कलम ७५ केंद्रातील संसदीय प्रणालीशी संबंधित आहेत तर कलम १६३ व कलम १६४ राज्यातील विधिमंडळ प्रणालीशी संबंधित आहेत.

कार्यकारी मंडळ व विधिमंडळ यांच्यातील संबंधांच्या आधारे आधुनिक लोकशाही सरकारचे संसदीय आणि अध्यक्षीय असे दोन भाग पाडता येतात. ज्या प्रणालीमध्ये धोरणे व कृतींसाठी कार्यकारी विभाग विधिमंडळाला उत्तरदायी असतो, ती संसदीय प्रणाली असते. या उलट अध्यक्षीय प्रणालीमध्ये धोरणे व कृतींसाठी कार्यकारी विभाग विधिमंडळाला उत्तरदायी नसतो आणि त्याच्या कार्यकालाबाबत घटनात्मकदृष्ट्या विधिमंडळापासून स्वतंत्र असतो.

संसदीय शासन व्यवस्थेलाच मंत्रिमंडळ सरकार, उत्तरदायी सरकार किंवा वेस्टमिन्स्टर पद्धतीचे सरकार असेही म्हटले जाते. ही प्रणाली ब्रिटन, जपान, कॅनडा, भारत व इतर देशांत आढळते. याउलट अध्यक्षीय सरकारला उत्तरदायी नसलेले किंवा संसदीय नसलेले किंवा स्थिर कार्यकारी प्रणालीचे सरकार असे म्हटले जाते. ही प्रणाली अमेरिका, ब्राझील, रशिया, श्रीलंका व इतर देशांत अस्तित्वात आहे.

संसदीय प्रणालीमध्ये मंत्रिमंडळ हा सत्तेचा गाभा असल्याने आयवॉर जेनिंग्जने तिला मंत्रिमंडळ प्रणाली असे म्हटले आहे. मंत्रिमंडळ (वास्तवातील कार्यकारी विभाग) संसदेला उत्तरदायी असते आणि जोपर्यंत संसदेचा विश्वास आहे तोपर्यंत अधिकारावर राहू शकते म्हणून संसदीय सरकारला उत्तरदायी सरकार असेही म्हटले आहे. संसदीय प्रणालीची सुरुवात झाली, त्या ब्रिटिश संसदेच्या स्थानावरून त्याला वेस्टमिन्स्टर स्वरूपाचे सरकार असेही म्हटले जाते.

पूर्वी ब्रिटिश घटनातज्ज्ञ व राजकीय तज्ज्ञ कॅबिनेटच्या संदर्भात पंतप्रधानाला 'समानातील प्रथम' असे म्हणत असत. परंतु अलीकडच्या काळात मंत्रिमंडळाच्या तुलनेत पंतप्रधानाचे अधिकार, प्रभाव व स्थान यांच्यात खूपच वाढ झाली आहे. आता ब्रिटनमधील राजकीय-प्रशासकीय व्यवस्थेमध्ये त्याची प्रभावशाली भूमिका आहे. त्यामुळे क्रॉसमन, मॅकिनटोश यांसारख्या अलीकडच्या काळातील राजकीय विश्लेषकांनी ब्रिटनमधील सरकारच्या प्रणालीला 'पंतप्रधान प्रणाली' असे म्हटले आहे. भारतीय संदर्भातही हे लागू पडते.

## संसदीय सरकारची वैशिष्ट्ये

भारतातील संसदीय शासन व्यवस्थेची वैशिष्ट्ये किंवा तत्त्वे खालीलप्रमाणे–

(१) **नाममात्र व वास्तव कार्यकारी विभाग** : राष्ट्रपती नाममात्र कार्यकारी प्रमुख (कायदेशीर प्रमुख किंवा पदाने प्रमुख) असतो तर पंतप्रधान हा प्रत्यक्ष कार्यकारी प्रमुख किंवा वास्तव कार्यकारी प्रमुख असतो. त्यामुळे राष्ट्रपती हा राष्ट्राचा प्रमुख असतो व पंतप्रधान हा सरकारचा प्रमुख असतो. राष्ट्रपतींना त्यांची कामे करण्यास साहाय्य करण्यासाठी व सल्ला देण्यासाठी पंतप्रधानांच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळ असेल, अशी तरतूद कलम ७४ मध्ये केली आहे. मंत्रिमंडळाने दिलेला सल्ला राष्ट्रपतींवर बंधनकारक असतो.[१]

(२) **बहुमत असलेल्या पक्षाचे सरकार** : लोकसभेत ज्या पक्षाला बहुमत मिळेल तो राजकीय पक्ष सरकार स्थापन करतो. त्या पक्षाच्या नेत्याला राष्ट्रपती पंतप्रधानपदावर नियुक्त करतो. पंतप्रधानांच्या सल्ल्यावरून राष्ट्रपती इतर मंत्र्यांची नियुक्ती करतात. ज्यावेळी कोणत्याही एका पक्षाला बहुमत मिळत नाही तेव्हा सरकार स्थापन करण्यासाठी राष्ट्रपती पक्षांच्या युतीला पाचारण करतात.

(१) ४२ वी घटनादुरुस्ती अधिनियम, १९७६ आणि ४४ वी घटनादुरुस्ती अधिनियम, १९७८ अन्वये मंत्रिमंडळाचा सल्ला राष्ट्रपतींवर बंधनकारक केला आहे.

(३) **सामूहिक जबाबदारी** : सामूहिक जबाबदारी हे संसदीय शासन व्यवस्थेचे पायाभूत तत्त्व आहे. मंत्री सामूहिकरीत्या सर्वसाधारणपणे संसदेला आणि विशेषत: लोकसभेला उत्तरदायी असतात (कलम ७५); ते एक संघ म्हणून काम करतात आणि एकत्रितरीत्या तरतात किंवा बुडतात. लोकसभा अविश्वासाचा ठराव संमत करून मंत्रिमंडळाला (पंतप्रधानांच्या नेतृत्वाखालील मंत्रिपरिषदेला) पदावरून हटवू शकते असे सामूहिक जबाबदारीच्या तत्त्वातून सूचित होते.

(४) **राजकीय एकजिनसीपणा** : सामान्यत: मंत्रिमंडळाचे सदस्य एकाच राजकीय पक्षाचे असतात आणि त्यामुळे त्यांची राजकीय विचारसरणी एकच असते. युतीच्या सरकारमध्ये मंत्री सर्वानुमतीला बांधील असतात.

(५) **दुहेरी सदस्यत्व** : मंत्री विधिमंडळाचे व कार्यकारी विभाग या दोहोंचे सदस्य असतात. म्हणजेच संसद सदस्य असल्याशिवाय व्यक्ती मंत्री बनू शकत नाही. जो मंत्री सलग सहा महिने संसद सदस्य नाही तो मंत्रिपदी राहू शकत नाही, असे राज्यघटनेत सांगितले आहे.

(६) **पंतप्रधानांचे नेतृत्व** : संसदीय शासन प्रणालीमध्ये सरकारमध्ये पंतप्रधान नेतृत्वपदाची भूमिका बजावतो. तो मंत्रिमंडळाचा प्रमुख असतो. संसदेचा प्रमुख असतो आणि सत्तारूढ पक्षाचा प्रमुख असतो. या सगळ्या पदांमुळे सरकारच्या कामकाजात त्याची अत्यंत महत्त्वाची भूमिका असते.

(७) **कनिष्ठ सदन विसर्जित करणे** : पंतप्रधानाच्या शिफारशीवरून राष्ट्रपती संसदेचे कनिष्ठ सभागृह (लोकसभा) विसर्जित करू शकतो. म्हणजेच लोकसभेची मुदत संपण्यापूर्वी पंतप्रधान लोकसभा विसर्जित करून नव्याने निवडणुका घ्याव्यात, असा सल्ला देऊ शकतो. संसदीय प्रणालीमध्ये कार्यकारी विभागाला विधिमंडळ विसर्जित करण्याचा अधिकार असतो.

(८) **गुप्तता** : मंत्री कामकाज गुप्त ठेवण्याच्या तत्त्वावर काम करतात आणि त्यांचे निर्णय, धोरणे आणि प्रक्रिया याविषयीची माहिती उघडपणे मांडू शकत नाहीत. पदभार स्वीकारण्यापूर्वी ते गुप्ततेची शपथ घेतात. राष्ट्रपती मंत्र्यांना ही गुप्ततेची शपथ देतात.

## अध्यक्षीय सरकारची वैशिष्ट्ये

भारतीय राज्यघटनेपेक्षा भिन्न असे अध्यक्षीय प्रणालीचे सरकार अमेरिकन राज्यघटनेत आहे. अमेरिकेतील अध्यक्षीय सरकारची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे–

(१) अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष हा राष्ट्राचा प्रमुख व सरकारचा प्रमुख असतो. राष्ट्रप्रमुख म्हणून त्याचे औपचारिक स्थान असते. सरकारचा प्रमुख म्हणून तो सरकारच्या कार्यकारी विभागाचा नेता असतो.

(२) चार वर्षांच्या ठरलेल्या मुदतीसाठी निर्वाचन मंडळ अध्यक्षाची निवड करते. गंभीर घटनाबाह्य कृतीसाठी महाभियोग चालविल्याशिवाय अमेरिकेचे कायदेमंडळ (काँग्रेस) अध्यक्षास पदावरून कमी करू शकत नाही.

(३) मंत्रिमंडळ किंवा 'किचन कॅबिनेट' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लहान गटाच्या साहाय्याने अध्यक्ष सरकार चालवितो. हा केवळ सल्लागारी गट असतो आणि यात निवडून न आलेले विभागीय सचिव असतात. अध्यक्ष त्यांची निवड व नियुक्ती करतो आणि ते फक्त त्याला उत्तरदायी असतात. अध्यक्ष त्यांना कधीही कमी करू शकतो.

(४) अध्यक्ष व त्याचे सचिव त्यांच्या कामकाजासाठी काँग्रेसला (अमेरिकेचे विधिमंडळ) उत्तरदायी नसतात. ते काँग्रेसचे सदस्य नसतात व काँग्रेसच्या सभांना उपस्थित राहत नाहीत.

(५) अध्यक्ष काँग्रेसचे कनिष्ठ सदन (हाऊस ऑफ रेप्रिझेन्टेटिव्ह) विसर्जित करू शकत नाही.

(६) अधिकारांची विभागणी हे अमेरिकेच्या अध्यक्षीय प्रणालीचे मूळ आहे. सरकारच्या वैधानिक, कार्यकारी आणि न्यायिक अधिकारांची तीन स्वतंत्र घटकांमध्ये विभागणी केली जाते.

## संसदीय प्रणालीतील फायदे

संसदीय पद्धतीच्या शासन व्यवस्थेचे फायदे किंवा गुणवैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे–

(१) **विधिमंडळ आणि कार्यकारी विभाग यांच्यात सामंजस्य** : संसदीय प्रणालीचा सर्वांत मोठा फायदा म्हणजे विधिमंडळ आणि कार्यकारी विभागामध्ये सलोख्याचे संबंध व सहकार्य असते. कार्यकारी विभाग हा विधिमंडळाचा भाग असतो आणि कामासाठी ते परस्परांवर अवलंबून असतात. त्यामुळे या दोन विभागांमध्ये विवाद किंवा मतभेदाला कमी वाव असतो.

(२) **उत्तरदायी सरकार** : संसदीय शासन व्यवस्थेच्या स्वरूपामुळे संसदेस व पर्यायाने जनतेस उत्तरदायी असलेले सरकार प्रस्थापित होते. मंत्री त्यांनी केलेल्या व न केलेल्या सर्व कामांसाठी संसदेला उत्तरदायी असतात. प्रश्नोत्तराचा तास, चर्चा, तहकुबी ठराव, अविश्वासाचा ठराव इत्यादी विविध मार्गांनी संसद मंत्र्यावर नियंत्रण ठेवते.

(३) **जुलूमशाहीवर नियंत्रण** : या प्रणालीमध्ये कार्यकारी अधिकार एका व्यक्तीकडे नसून व्यक्तीसमूहाकडे (मंत्रिमंडळ) असतात. अशा या विकेंद्रित अधिकारांमुळे कार्यकारी विभागाच्या हुकूमशाही प्रवृत्तीस आळा बसतो. कार्यकारी विभाग संसदेला उत्तरदायी असतो आणि अविश्वासाच्या ठरावान्वये कार्यकारी मंडळास सत्तेपासून दूर करता येते.

(४) **पर्यायी सरकार** : जर सत्तारूढ पक्षाने बहुमत गमावले तर राष्ट्रपती सरकार स्थापन करण्यासाठी विरोधी पक्षाला पाचारण करू शकतो. म्हणजेच नव्या निवडणुका न घेता दुसरे पर्यायी सरकार बनविता येते. त्यामुळे डॉ. जेनिंग्ज यांनी म्हटल्याप्रमाणे 'विरोधी पक्षनेता हा पर्यायी पंतप्रधान असतो.'

(५) **विस्तृत प्रतिनिधित्व** : संसदीय प्रणालीमध्ये लोकप्रतिनिधी असलेल्या मंत्र्यांच्या गटाकडे कार्यकारी अधिकार असतात. त्यामुळे सरकारमध्ये सर्व घटकांना व क्षेत्रांना प्रतिनिधित्व देणे शक्य असते. मंत्र्यांची निवड करताना पंतप्रधान हा घटक विचारात घेऊ शकतो.

**संसदीय प्रणालीतील उणिवा**

वरील गुणवैशिष्ट्ये असली तरी संसदीय प्रणालीमध्ये खालील उणिवा वा त्रुटी आढळतात–

(१) **अस्थिर सरकार** : संसदीय प्रणालीमध्ये सरकार स्थिर नसते. सरकार त्याचा कार्यकाल पूर्ण करील याची खात्री नसते. मंत्रिमंडळ टिकून राहण्यासाठी त्यास सातत्याने बहुमताची गरज असते. अविश्वासाचा ठराव किंवा राजकीय पक्षांतर किंवा अनेक पक्षांच्या युतीमुळे होणारे तोटे यांमुळे सरकार अस्थिर बनू शकते. मोरारजी देसाई, चरणसिंग, व्ही. पी. सिंग, चंद्रशेखर, देवेगौडा आणि आय. के. गुजराल यांच्या नेतृत्वाखालील सरकारे याची उदाहरणे आहेत.

(२) **धोरणात सातत्याचा अभाव** : दीर्घकालीन धोरणे आखणे व त्यांची अंमलबजावणी करणे यासाठी संसदीय प्रणाली फारशी सोयीची नाही. राजकीय अधिकाराच्या अनिश्चिततेमुळे असे होते. साधारणपणे सत्तारूढ पक्ष बदलल्याने सरकारच्या धोरणातही बदल होतो. उदाहरणार्थ– १९७७ मधील मोरारजी देसाई यांच्या नेतृत्वाखालील जनता सरकारने आधीच्या काँग्रेस सरकारची अनेक धोरणे बदलली. इ. स. १९८० मध्ये सत्तेवर परत आल्यावर काँग्रेस सरकारने तेच केले.

(३) **मंत्रिमंडळाची हुकूमशाही** : ज्यावेळी संसदेमध्ये सत्तारूढ पक्षाचे निर्विवाद बहुमत असते त्यावेळी मंत्रिमंडळ एकाधिकारशाही स्वरूपाचे बनते व त्याच्याकडे जवळजवळ अमर्यादित सत्ता असते. संसदीय प्रणालीमध्ये कार्यकारी विभागाला जुलूमशाहीची संधी मिळते, असे एच. जे. लास्की याने म्हटले आहे. ब्रिटनचे माजी पंतप्रधान रॅम्से मूर यांनीही 'मंत्रिमंडळाच्या हुकूमशाही'वर टीका केली आहे.[२] इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांच्या काळातही ही वृत्ती दिसून आली.

(४) **अधिकार विभागणीच्या विरोधी** : संसदीय प्रणालीमध्ये विधिमंडळ व कार्यकारी विभाग एकत्र असतात; ते विभक्त करता येत नाहीत. मंत्रिमंडळ हे विधिमंडळाचे तसेच कार्यकारी विभागाचे नेतृत्व करते. ''विधिमंडळ आणि कार्यकारी विभाग यांना जोडणाऱ्या पट्ट्याचे मंत्रिमंडळ हे एक संयोग चिन्ह आहे.'' असे बॅगेहॉट यांनी म्हटले आहे. त्यामुळे सरकारची संपूर्ण प्रणाली अधिकारांची विभक्तता या तत्त्वाच्या विरोधी असते.[३] खरे तर, तेथे अधिकारांचे एकत्रीकरणच असते.

(५) **नवशिक्यांचे सरकार** : मंत्री त्यांच्या विषयातील तज्ज्ञ नसल्याने संसदीय प्रणाली प्रशासकीय क्षमतेसाठी सोयीची नसते. मंत्र्यांच्या निवडीसाठी पंतप्रधानाकडे मर्यादित पर्याय असतात. तो केवळ संसद सदस्यांमधूनच निवड करू शकतो आणि त्याबाहेरच्या तज्ज्ञांचा पर्याय त्यास उपलब्ध नसतो. याशिवाय मंत्री त्यांचा बहुतेक वेळ संसदीय कामकाज, मंत्रिमंडळाच्या बैठका आणि पक्ष कार्याला देतात.

संसदीय प्रणाली आणि अध्यक्षीय प्रणाली यांची वैशिष्ट्ये, त्यांचे गुणविशेष व त्यातील उणिवा वा त्रुटी यांची आता आपण तुलना करूया.

---

(२) 'हाऊ ब्रिटन इज गव्हर्न' हे रॅम्से मूर यांनी लिहिलेले लोकप्रिय पुस्तक आहे.

(३) व्यक्तिगत स्वातंत्र्याला चालना देण्यासाठी फ्रान्समधील राजकीय विचारवंत मॉन्तेस्क्यू याने 'दी स्पिरीट ऑफ लॉज्' (१७४८) या पुस्तकातून हा सिद्धान्त मांडला होता. एका व्यक्तीकडे किंवा एका गटाकडे अधिकार केंद्रित झाल्याने जुलूमशाही वाढेल आणि व्यक्तिगत स्वातंत्र्य नाकारले जाईल, असे त्याचे प्रतिपादन आहे.

## संसदीय प्रणाली व अध्यक्षीय प्रणाली

| | |
|---|---|
| **वैशिष्ट्ये** | |
| **संसदीय प्रणालीची वैशिष्ट्ये** | **अध्यक्षीय प्रणालीची वैशिष्ट्ये** |
| (१) दुहेरी कार्यकारी विभाग | (१) एकच कार्यकारी विभाग |
| (२) बहुमताच्या पक्षाची सत्ता | (२) निश्चित कालावधीसाठी अध्यक्ष आणि कायदे मंडळाचे सभासद स्वतंत्रपणे निवडले जातात. |
| (३) सामूहिक जबाबदारी | (३) सामूहिक जबाबदारी नाही. |
| (४) राजकीय एकजिनसीपणा | (४) राजकीय एकजिनसीपणा असेलच असे नाही. |
| (५) दुहेरी सदस्यत्व | (५) एकेरी सदस्यत्व |
| (६) पंतप्रधानाचे नेतृत्व | (६) अध्यक्षाचे वर्चस्व |
| (७) कनिष्ठ गृह विसर्जित करता येते | (७) कनिष्ठ गृह विसर्जित करता येत नाही. |
| (८) अधिकारांचे एकत्रीकरण | (८) अधिकारांची विभागणी |
| **फायदे व उणिवा** | |
| **संसदीय प्रणालीचे फायदे** | **अध्यक्षीय प्रणालीच्या उणिवा** |
| (१) विधिमंडळ व कार्यकारी विभाग यांत सामंजस्य | (१) विधिमंडळ व कार्यकारी विभाग यांत संघर्ष |
| (२) उत्तरदायी सरकार | (२) उत्तरदायी सरकार नाही. |
| (३) जुलूमशाहीवर नियंत्रण | (३) एकाधिकारशाही होण्याची शक्यता |
| (४) विस्तृत प्रतिनिधित्व | (४) संकुचित प्रतिनिधित्व |
| **संसदीय प्रणालीच्या उणिवा** | **अध्यक्षीय प्रणालीचे फायदे** |
| (१) अस्थिर सरकार | (१) स्थिर सरकार |
| (२) धोरणांत सातत्याचा अभाव | (२) धोरणात निश्चितता |
| (३) अधिकार विभागणीच्या विरोधी | (३) अधिकार विभागणीवर आधारित |
| (४) नवशिक्यांचे सरकार | (४) तज्ज्ञांचे सरकार |

## संसदीय प्रणाली स्वीकारण्याची कारणे

अमेरिकेप्रमाणे सरकारची अध्यक्षीय प्रणाली स्वीकारावी अशी विनंती संविधान सभेत करण्यात आली होती.[४] परंतु घटनाकारांनी खालील कारणांसाठी ब्रिटिश संसदीय प्रणाली स्वीकारली.

(१) **परिचयाची प्रणाली :** ब्रिटिश काळापासून भारतात कार्यरत असलेली संसदीय प्रणाली घटनाकर्त्यांच्या थोडी परिचयाची होती. ''गेल्या तीस-चाळीस वर्षांमध्ये देशाच्या प्रशासनामध्ये काही प्रमाणात उत्तरदायित्वाची भावना आली आहे. आपली घटनात्मक परंपरा संसदीय पद्धतीची बनली आहे. या अनुभवानंतर आता परत नवीन प्रयोग कशासाठी करायचा?''[५] असे के. एम. मुन्शी यांनी म्हटले आहे.

(२) **अधिक उत्तरदायित्वाला प्राथमिकता :** ''लोकशाहीतील कार्यकारी विभागाने दोन अटींची पूर्तता केली पाहिजे. स्थैर्य आणि उत्तरदायित्व. दुर्दैवाने या दोन्ही निकषांची समप्रमाणात पूर्तता होईल, अशी प्रणाली अजून विकसित झालेली नाही. अमेरिकेच्या पद्धतीमध्ये स्थैर्य जास्त आहे, पण उत्तरदायित्व कमी आहे. या उलट ब्रिटनच्या प्रणालीमध्ये उत्तरदायित्व जास्त आहे, पण स्थैर्य कमी आहे. जास्त स्थैर्यापेक्षा जास्त उत्तरदायित्वाला प्राथमिकता देऊन घटनेच्या मसुद्यात कार्यकारी संसदीय प्रणालीची शिफारस केली आहे,[६] असे डॉ. बी. आर. आंबेडकर यांनी संविधान सभेत म्हटले होते.

(४) के. टी. शाह अध्यक्षीय प्रणाली स्वीकारण्याबाबत अनुकूल होते.
(५) कॉन्स्टिट्युअंट असेंब्ली डिबेट्स, खंड ७, पृष्ठे २८४-२८५.
(६) कॉन्स्टिट्युअंट असेंब्ली डिबेट्स, खंड ७, पृष्ठ ३२.

(३) **विधिमंडळ–कार्यकारी विभाग यांच्यातील विवाद टाळण्याची गरज** : अमेरिकेसारख्या अध्यक्षीय प्रणालीमध्ये विधिमंडळ आणि कार्यकारी विभाग यांच्यामध्ये विवाद उद्‌भवणे स्वाभाविक असल्याने तो टाळणे हा घटनाकारांचा हेतू होता. लोकशाहीच्या बाल्यावस्थेत शासनाच्या या दोन विभागांमध्ये फूट, विवाद, तेढ किंवा भांडण यांचा सतत धोका पत्करणे परवडणारे नाही. देशाचा विविधांगी विकास व्हावा, यासाठी उपयुक्त अशा प्रणालीचे सरकार त्यांना हवे होते.

(४) **भारतीय समाजाचे स्वरूप** : भारत हा जगातील सर्वांत वैविध्यपूर्ण आणि गुंतागुंतीचा बहुआयामी समाज आहे. त्यामुळे सरकारमध्ये विविध घटकांना, हितांना व क्षेत्रांना प्रतिनिधित्व मिळण्यास वाव असावा या उद्देशाने घटनाकारांनी संसदीय प्रणाली निवडली. यामुळे लोकांच्या राष्ट्रीय भावनेस आणि एकसंध भारताच्या निर्मितीस चालना मिळते.

संसदीय प्रणाली चालू ठेवावी की, त्याजागी अध्यक्षीय प्रणाली आणावी, हा मुद्दा आपल्या देशात सत्तरच्या दशकापासून चर्चिला जात आहे. सन १९७५ मध्ये काँग्रेस सरकारने स्थापन केलेल्या स्वर्णसिंग समितीने याचा तपशीलवार विचार केला. समितीच्या मतानुसार संसदीय प्रणाली चांगल्या रीतीने चालू असून तिच्या जागी अध्यक्षीय प्रणाली आणण्याची आवश्यकता नाही.

**भारतीय आणि ब्रिटनमधील पद्धतीतील फरक**

भारतातील सरकारची संसदीय प्रणाली मुख्यत: ब्रिटनमधील संसदीय प्रणालीवर आधारित आहे. तथापि, ती ब्रिटनमधील प्रणालीची हुबेहूब प्रतिकृती बनलेली नाही, त्यामध्ये खालील प्रकारचे फरक आढळून येतात.

(१) भारतात प्रजासत्ताक पद्धती आहे, तर ब्रिटनमध्ये राजसत्ताक पद्धती आहे. म्हणजेच भारतामध्ये राष्ट्राचा प्रमुख (राष्ट्रपती) निवडला जातो, तर ब्रिटनमध्ये राष्ट्राचा प्रमुख (राजा किंवा राणी) वंशपरंपरेने बनतो.

(२) ब्रिटनमधील पद्धती संसदेच्या सार्वभौमत्वावर आधारित आहे, तर भारतात संसद सर्वोच्च नसून लिखित राज्यघटना, संघराज्यीय पद्धती, न्यायालयीन पुनर्विलोकन आणि मूलभूत हक्क यांमुळे संसदेला थोडे आणि मर्यादित अधिकार आहेत.[७]

(३) ब्रिटनमध्ये पंतप्रधान हा संसदेच्या कनिष्ठ गृहाचा (हाऊस ऑफ कॉमन्स) सदस्य असला पाहिजे, अशी तरतूद आहे. भारतात पंतप्रधान संसदेच्या दोहोंपैकी कोणत्याही गृहाचा सदस्य असला तरी चालतो.[८]

(४) सामान्यत: ब्रिटनमध्ये फक्त संसद सदस्यांनाच मंत्री पदावर नेमले जाते. भारतात संसद सदस्य नसलेल्या सदस्यांनासुद्धा मंत्रिपदावर नेमता येते, मात्र सहा महिन्यांच्या आत त्यांना संसदेवर निवडून यावे लागते.

(५) ब्रिटनमध्ये मंत्र्याच्या कायदेशीर उत्तरदायित्वाची पद्धती आहे, भारतात मात्र अशी पद्धती नाही. ब्रिटनप्रमाणे राष्ट्रप्रमुखाच्या अधिकृत कृतींसाठी भारतात मंत्र्यांना सहस्वाक्षरी करावी लागत नाही.

(६) ब्रिटिश मंत्रिमंडळ पद्धतीची 'शॅडो कॅबिनेट' ही वैशिष्ट्यपूर्ण पद्धत आहे. सत्तारूढ मंत्रिमंडळाबरोबर संतुलन राखण्यासाठी विरोधी पक्ष ती स्थापन करतो आणि सदस्यांना भविष्यातील मंत्रिपदासाठी तयार करतो. भारतात अशी पद्धती नाही.